# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१४/०७/२०१६.

**१) अवैध गर्भपात करतांना महिलेचा मृत्यु झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०६/०७/२०१६ रोजी २१.०० वा. पुर्वी. महिला वय १९ वर्ष, व आरोपी हे पती पत्नी असुन यांचा दिनांक ३०/०५/१६ ला प्रेम विवाह झाला होता. आणि प्रेम संबधातुन तिला विवाहापुर्वी आरोपी कडुन गर्भधाराणा होवुन पाच महीण्याचा गर्भ होता. त्यावरुन अवैध गर्भपात करतांना तिचा मृत्यु होवु शकतो हे माहीत असतांना सुध्दा आरोपीने बुट्टीबोरी वरुन साकोली येथे येवुन तिचा गर्भपात करुन आणला. असे फिर्यादी गं.भा. किरणबाई सुदाम राहांगडाले वय ४० वर्ष, रा. डोंगरी बुज यांचे तोंडी रिपोर्ट वरून व मर्ग क्र. ४५/१६ कलम १७४ जाफौ. चे चौकशी वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०४,३१५,३१६ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. खंडाते पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०६/२०१६ रोजी ११.०० वा. दर. फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७.५ वर्ष, ही ॲडमिशन करण्यास जाते म्हणुन आरोपी सोबत मोटार सायकलवर बसुन गेली व घरी परत आली नाही. म्हणुन फिर्यादीच्या मुलीला आरोपीने पळवुन नेले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पाटील पो.स्टे. साकोली हे करीत आहे.

**३) संगणमत करुन मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी . :—**

दिनांक १०/०७/०१६ रोजी ०९.०० वा. दर. तिन्ही आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादी सौ. वर्षा दत्तु पारधी, वय ३५ वर्ष, रा. भेंडाळा व तिचा पती व मुलांसोबत धु—याचा पाणी खांडीतुन जाण्याच्या कारणावरुन भांडण व शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली व आरोपी क्र. ३ याने हातातील लाखडी काठीने फिर्यादीच्या डाव्या पायावर मारुन दुखापत केली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४)काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा दाखल . :—**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी ११.०० वा. दरम्यान भुपेश गुलाब न्हाने याला आरोपीने घरगुती कारणावरुन वाद व शिविगाळ करुन काठीने दोन्ही पायाच्या टोंगळयावर व हाता पायावर काठीने मारुन जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली आहे.

**५) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक १३/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. कारधा, करडी, साकोली, व पवनी येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४ लिटर हातभट्टी दारू कि. १५००/रु. व ४५० मिली. लिटर देशी दारु. कि. १५०/रु. तसेच जुगारातुन कि. २७८/— रु. असा एकुण कि. १९२८ /—रू. चा माल जप्त करण्यात आला.

**( श्री.बी.आर.गाडे)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.